# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत**

**(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. 832 ए, शिवाजीनगर पुणे- 411004**

**दूरध्वनी क्र.: 020-29709396** **वेबसाईट : www.mscepune.in** **ई-मेल : mscepune@gmail.com**

जा.क्र.मरापप /स्वी.स/ 208 /2026/ दि.15/05/2026

## प्रसिद्धीपत्रक

**विषय : संगणक टंकलेखन रिपीटर परीक्षा (GCC-TBC) एप्रिल,2026 चा निकाल जाहीर करणेबाबत..**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत इंग्रजी, मराठी व हिंदी 30,40 श.प्र.मि. विषयांची शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र रिपीटर परीक्षा(GCC-TBC) दि.18/04/2026 ते 22/04/2026 या कालावधीत आयोजित करण्यात आलेली होती.

सदर परीक्षेचा निकाल दि.15/05/2026 रोजी जाहीर करण्यात येत आहे. या परीक्षेचा निकाल संस्थाचालकांच्या लॉगिन मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकाची ऑनलाईन प्रिंट घेता येईल.

निकाल जाहीर झाल्यापासून 7 दिवसांचे आत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र डिजिटल स्वाक्षरीने ऑनलाईन स्वरुपात संस्थांच्या लॉगिनला उपलब्ध करून देण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांची छपाई टंकलेखन संस्थाचालकांनी 100 जीएसएम(GSM) कागदावर कलर प्रिंट काढून विद्यार्थ्यांना वितरित करणे बंधनकारक आहे. संस्थांनी संबंधित विद्यार्थ्यास प्रमाणपत्र वितरित केलेली पोहोच दप्तरी जतन करून ठेवावी. निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून 7 दिवसांचे आत परीक्षार्थींनी गुण पडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी संस्थेमधून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुण पडताळणीसाठी प्रति विषय रु.100/- प्रमाणे व छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रु.400/- प्रमाणे रक्कम ऑनलाईन पद्धतीने **दि.22 मे,2026** पर्यंत भरणा करता येईल.गुण पडताळणी व छायाप्रती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यालयीन 5 दिवसांमध्ये पुनर्मूल्यांकनासाठी प्रति विषय रु.600/- प्रमाणे ऑनलाईन पद्धतीने रक्कम भरून अर्ज करावेत. यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

15/5/26

दिनांक : 15/05/2026

स्थळ : पुणे

**डॉ.नंदकुमार बेडसे (भा.प्र.से),**
**अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

GCC-TBC-APRIL 2026 ENGLISH /MARATHI/ HINDI (30,40 wpm) EXAM SUMMARY

निकालाची संक्षिप्त माहिती :-

| Exam Name | Total Appear Student Count | Total Present Student Count | Total Absent Student Count | Total Pass Student Count | Total Fail Student Count | Total Reserve Student Count | Total Cancel Student Count | Passing Percentage % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| GCC-TBC-English 30 wpm | 5805 | 5297 | 508 | 3451 | 1841 | 05 | 00 | 65.15% |
| GCC-TBC-Marathi 30 wpm | 9306 | 8449 | 857 | 5067 | 3375 | 07 | 00 | 59.97% |
| GCC-TBC-Hindi 30 wpm | 63 | 58 | 05 | 38 | 20 | 00 | 00 | 65.52% |
| GCC-TBC-English 40 wpm | 6905 | 6395 | 510 | 3427 | 2953 | 15 | 00 | 53.59% |
| GCC-TBC-Marathi 40 wpm | 984 | 904 | 80 | 593 | 310 | 01 | 00 | 65.60% |
| GCC-TBC-Hindi 40 wpm | 28 | 24 | 04 | 08 | 16 | 00 | 00 | 33.33% |

15/5/26.

डॉ.नंदकुमार बेडसे (भा.प्र.से),
अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.